वै.शि. व औ.द्र.विभाग/वैसेवा-4

मागील कार्यवाहीस अनुसरुन सादर.

02. डॉ. तबिता जॉय, सहयोगी प्राध्यापक, दंतविकृती व अणुजीवशास्त्र, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई यांना आस्थापना मंडळाच्या शिफारशीनुसार प्राध्यापक, दंतविकृती व अणुजीवशास्त्र, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या पदावर दि.07.10.2022 रोजीच्या आदेशानुसार पदोन्नती प्रदान करण्यात आली होती. परंतू डॉ. तबिता जॉय यांनी कौटूंबिक कारणास्तव पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्यास 3 महिन्याची मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली होती. तसेच पदोन्नती नंतरची पदस्थापनेत अंशत: बदल करुन शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई येथे पदस्थापना मिळणेबाबत शासनास विनंती केली होती.

03 डॉ. तबिता जॉय यांना पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने दि.17.11.2022 रोजीच्या पत्रान्वये दि.07.12.2022 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

04. डॉ. जॉय यांच्या विनंतीच्या अनुषंगाने त्यांच्या पदोन्नतीच्या पदस्थापनेत बदल करण्याची नस्ती शासनाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आली होती. सदर प्रस्तावास शासनाची मान्यता प्राप्त झाली असल्याने डॉ. तबिता जॉय यांची पदोन्नतीनंतरची पदस्थापना मुंबई येथे करण्यास हरकत नसावी.

मान्यतेनंतर पृ. /प.वि. वरील आदेश निर्गमित करण्यात येईल.

अ.स. (वैसेवा-4/श्री. धोंडे)

उ.स. (वैसेवा-4/श्रीम. सुळे)

सचिव (वै.शि.वि.)

प्राध्यापक, दंतविकृती व अणुजीवशास्त्र, या पदावर आस्थापना मंडळामार्फत निव्वळ तात्पुरती पदोन्नती प्रदान करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**

**शासन आदेश क्र.पीआरओ-3321/प्र.क्र.106/वैसेवा-4**

**मंत्रालय, मुंबई-400 001**

**दिनांक :- 16 जानेवारी, 2023.**

**<u>वाचा :-</u>** 1)संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. एमएमईआरएस/आस्था मंडळ/प्राध्यापक/दंतविकृती व अणुजीवशास्त्र/10225/ दंत/ क/
दि.30.07.2021

2) सामान्य प्रशासन विभागाचे गोपनीय पत्र क्र.ईएसबी-1122/ प्र.क्र.54/13, दि.30.06.2022.

3) शासन आदेश समक्रमांक दि.07.10.2022

4) शासन आदेश समक्रमांक दि.17.11.2022.

5)आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र. डिएमईआर-14028/26
/2022-ईएसटी 2 दि.01.11.2022.

**<u>प्रस्तावना :-</u>**

शासकीय दंत महाविद्यालयातील प्राध्यापक, दंतविकृती व अणुजीवशास्त्र, गट-अ (राजपत्रित) या पदावर पदोन्नतीसाठी आस्थापना मंडळाकडून शिफारस करण्यात आल्यानुसार डॉ. तबीता जॉय (बेंजामिन) यांची सहयोगी प्राध्यापक, दंतविकृती व अणुजीवशास्त्र या पदावरुन प्राध्यापक, दंतविकृती व अणुजीवशास्त्र या पदावर पदोन्नती देऊन शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे पदस्थापना करण्यास शासनाची मान्यता देण्यात आली होती.

तथापि, डॉ. तबिता जॉय (बेंजामिन) यांची शासकीय दंत महाविद्यालय, व रुग्णालय, नागपूर येथे पदस्थापना केल्यामुळे डॉ. तबिता जॉय (बेंजामिन) यांनी कौटुंबिक कारणास्तव पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्यास मुदतवाढ मिळणेबाबत तसेच पदस्थापनेत

बदल करण्याबाबत विनंती केली होती. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांनी त्यांच्या दि.01.11.2022 रोजीच्या पत्रान्वये देखील डॉ. जॉय यांच्या पदस्थापना बदलण्याबाबत शासनास शिफारस केली होती. डॉ. तबिता जॉय (बेंजामिन) यांना पदोन्नतीच्या पदावर रूजु होण्यासाठी शासन पत्र समक्रमांक दि.17.11.2022 अन्वये दि.07.12.2022 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्याअनुषंगाने डॉ. तबिता जॉय (बेंजामिन) यांच्या पदोन्नतीच्या पदस्थापनेत बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन आदेश :-**</u>

संदर्भाधीन क्र. 3 येथील आदेशातील डॉ. जॉय यांच्या पदोन्नतीची पदस्थापना रद्द करण्यात येत असून डॉ. जॉय, सहयोगी प्राध्यापक (दंतविकृती व अणुजीवशास्त्र) शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय मुंबई यांची प्रशासकीय कारणास्तव पदोन्नती नंतरची पदस्थापना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे:-

| अ. क्र. | अध्यापकाचे नाव | सध्या कार्यरत असलेले ठिका व पदनाम | पदस्थापनेचे ठिकाण व प | प्रवर्ग | ज्येष्ठत क्र. |
|---|---|---|---|---|---|
| | डॉ. तबिता ज (बेंजामिन) | सहयोगी प्राध्यापक, दंतविकृत अणुजीवशास्त्र, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई | प्राध्यापक, दंतविकृती व अणुजीवशास्त्र, शासकीय दंत महाविद्यालय रुग्णालय, मुंबई | खुल | 2 |

2. डॉ. तबिता जॉय (बेंजामिन) सहयोगी प्राध्यापक, दंतविकृती व अणुजीवशास्त्र, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई यांचा दि.08.12.2022 पासून या आदेशाच्या दिनांकापर्यंतचा कालावधी हा प्रशासकीय कारणास्तव झालेला विलंब असल्याने सदरचा कालावधी हा पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्याकरीता असणारी मुदतवाढ म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

3. डॉ. तबिता जॉय (बेंजामिन) यांच्या पदोन्नतीच्या दि.07.10.2022 च्या शासन आदेशातील परि.2 मधील अटी व शर्ती लागू राहतील.

4. हे आदेश तात्काळ अंमलात येतील. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, संचालनालय यांनी याबाबत स्वतंत्र कार्यकारी आदेश काढण्याची आवश्यकता नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( वैशाली सुळे )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

1) आयुक्त ,वैद्यकीय शिक्षण व संशोधन, संचालनालय, मुंबई, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

2) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, संचालनालय, मुंबई,.

**प्रत अग्रेषित** :-

1) मा. मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

2) महालेखापाल-1, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य,मुंबई ,

3) अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई/ नागपूर,

4) अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई,

5) डॉ. तबिता जॉय (बेंजामिन), आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण यांच्यामार्फत),

6) निवडनस्ती / सग्रहार्थ वैसेवा-4.